९८

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय भाषा
दा. क्र. ९८

# तोतरा तानसेन

BVBK-0400018

बा. वा.
नों. क्र. १८

# तोतरा तानसेन

... ग्रंथालय शाखा ...
... विभाग
दा. क्र. १८
विषय बा. वा.

: लेखक :
दत्ताराम आ. बारसकर

BVBK-0400018

जयहिंद प्रकाशन
झावबावाडी, मुंबई २

किंमत ६० पैसे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | दयानंदाचे आभाळाचे मन ... ... ... | ३ |
| २ | तानसेनासारखी तोतऱ्याची तल्लीनता ... ... | ५ |
| ३ | मुलांनी मुलांसाठी चालविलेले दुकान ... ... | ७ |
| ४ | मनाला मोहविणारी मनमोहनची कृतज्ञता ... | १० |
| ५ | जीवनात हवा कष्टाळूपणा व जिद्द ... ... | १२ |
| ६ | पक्षी-प्राणी-आपले सोबती ... ... ... | १४ |
| ७ | चोरी कधी करूं नये ... ... ... ... | १५ |
| ८ | भर रस्त्यात मुलांची मारामारी ... ... | १६ |
| ९ | गोड बोलणे-वागणे एक सुसंस्कार ... ... | १७ |
| १० | चोर पकडणारा छोटा जेम्स बॉंड ... ... | १९ |
| ११ | नशिबापेक्षा प्रयत्नच श्रेष्ठ ... ... ... | २[illegible] |
| १२ | पेपरमिंटच्या गोळीतील देशव्यापी प्रेम ... | २२ |



मुद्रक : वि. ज. देसाई, वैभव प्रिंटिंग प्रेस, मुंबई ४००००४

प्रकाशक : ग. का. रायकर, जय हिंद प्रकाशन, मुंबई ४००००२

चित्रकार : श्री. र. स. कंटक ❀ प्रथमावृत्ती : जुलै १९७८

# १. दयानंदाचे आभाळाचे मन

पणजीला रहाणारा पंधरा–सोळा वर्षांचा एक मुलगा. उच्च माध्यमिक शाळेत शिकत होता.

एकदा सुटीच्या दिवशी तो सायंकाळीं आजोळी पेडण्याहून पणजीला जायला मोटारीतून म्हापशाला आला. बेतीपर्यंत जाणाऱ्या गाडीची वाट पहात तो मोटारस्टँडवर उभा राहिला.

मोटारस्टँडवर एक गरीब खेडूत म्हातारा केविलवाण्या चेहऱ्याने फिरून प्रवाश्यांकडे कसलीतरी याचना करीत होता. पण कोणी त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. त्या छोट्या शाळकरी मुलाने त्याला पाहिले. त्याला त्याची दया आली. त्याने त्या म्हाताऱ्याला विचारले, 'बाबा, तुम्ही लोकांकडे काय मागितले ?' म्हातारा म्हणाला, 'मी सतरीच्या वाळपईवरून आलोय. पणजीला चाललोय. तिथे माझा मुलगा इस्पितळात आहे. इथं आलो आणि माझे पैसे हरवले हे समजले. आता मी काय करू ? पणजीला कसा जाऊ ? मला पैसे हवेत. मुलाला औषध न्यायचे आहे. इथं कोणी ओळखीचा नाही. भिक्षा मागण्याचं नशिबी आलं.'

असे सांगून म्हाताऱ्याने पुढे जायला पाऊल उचलले, 'थांबा आजोबा, माझ्याजवळ हे जेवढे आहेत तेवढे घ्या' असे म्हणत त्या मुलाने खिशातले सगळे पैसे त्या म्हाताऱ्याच्या हातावर ठेवले. म्हाताऱ्याच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रु चमकले.

'देव तुझं भलं करील मुला' असा आशीर्वाद देऊन म्हातारा पणजीला जाणाऱ्या मोटारीत चढला.

तो मुलगा मात्र नंतर आठ मैलांचे अंतर पायी चालून पणजीला गेला. तो दमला पण त्याला खूप मोठे समाधान लाभले. त्याने दिलेल्या पैशामुळे तो म्हातारा बाप आपल्या आजारी मुलाला वेळेवर भेटू शकला होता.

ही कथा काल्पनिक नव्हे. खरोखरी घडलेली ही घटना आहे. त्या लहान मुलाचे नांव दयानंद. नावाप्रमाणेच तो दयाळू. तो मुलगा मोठेपणी गोव्याचा मुख्यमंत्री बनला. त्याचेच नांव दयानंद बांदोडकर. श्री. बांदोडकर यांचे हे असे आभाळाचे मन होते. विशाल आणि दयाशील.

आभाळात विविध रंगांची उधळण नेहमीच होत असते. इंद्रधनुष्याची सात रंगी कमानही आपणास आभाळातच पहायला मिळते. ईश्वराची पर्जन्यरूपी करुणा हजारो धारांनी आभाळातून बरसून तापलेल्या धरणीला शांत करीत असते, आणि आभाळात स्वच्छंदाने पक्षी विहार करीत असतात.

गोव्याचे लोकनेते, पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्या जीवनाचा विचार केला तर त्यांच्या मनाला आभाळाची उपमा शोभून दिसते असे नव्हे, तर ती यथार्थच वाटते.

❋

## २. तानसेनासारखी तोतऱ्याची तल्लीनता

आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशीची गोष्ट. मी विठ्ठल मंदिरांत गेलो होतो. त्यावेळी श्रीची पूजाअर्चा पूर्ण झाली होती आरती चालली होती. तेव्हा ओघाने मीही त्या आरतीत सामील झालो.

आरती म्हणणारी मंडळी मनोभावाने एकामागून एक देवतेची आरती म्हणत होती. प्रथम गणपतीची आरती झाली. नंतर शंकराची आणि त्यानंतर श्रीविठ्ठलाची, दुर्गा भवानीची, हनुमंताची होऊन शेवटी श्रीज्ञानेश्वराची. अशा आरत्या म्हटल्या गेल्या. मंदिराच्या आवारात गाभाऱ्यांत तोबा गर्दी होती. त्यामुळे कुणालाही हालचाल करता येत नव्हती. छतावर विजेचे पंखे गरगर फिरत असतानाही कमालीचा उकाडा भासत होता. जो तो घामाने ओलाचिंब झालेला होता.

अशा वातावरणात आरती जल्लोषात चालू असताना मधून-मधून कुणी तरी मुलाचा तोतरा 'झय घेव—झय घेव' असा आवाज माझ्या कानी पडत होता. मी अवतीभंवती पाहिले. दहाबारा वर्षांचा एक गोरापान छोकरा जोराजोराने आरती म्हणत होता. त्याचाच तो तोतरा आवाज होता. तो स्वतःला पार विसरून गेला होता. अगदी तानसेनासारखा तल्लीनतेने तो आरती म्हणत होता. ईश्वरावर त्याची केवढीतरी निष्ठा होती. श्रद्धा होती, प्रेम होते. मला त्याचे नवल वाटले. तो ठेका


व्यवस्थित धरीत होता. तोंड बरोबर करीत होता. सूरही बरोबर होता त्याचा. एकच कमतरता त्याच्या बाबतीत होती ती आवाजाची. त्याचे वाणीचे व्यंग वगळले तर त्याचे रूप मोठे देखणे होते. रंगाने तो गोरापान होता. नाकीडोळी नीटस होता. त्या मंदिरात ईश्वराच्या जवळ असताना माझ्या मनांत त्या मुलाविषयी विचार आला. ईश्वराने या मुलाला सुंदर रूप दिले पण सुरेल आवाज-वाणी का बरे दिली नाही ? ती दिली असती तर ?

पण दुसऱ्या क्षणी मला असे वाटले ईश्वराने जरी या मुलाला सुस्पष्ट वाणी दिली नसली तरी काय बिघडले आहे ? ज्यांना चांगली वाणी लाभलेली असते, ज्याचे हातपाय धड असतात, डोळे शाबूत असतात, थोडक्यात ज्यांना सगळेच अवयव व्यवस्थित लाभलेले असतात अशांपैकी कितीजण भक्तिभावनेने ईश्वरपूजन करतात ? ईश्वराचे गुण गातात ? उलट ते ईश्वराची टवाळीच अधिक करतात. आरतीच्या वेळी उगाचच मोठ्याने आवाज चढवितात. काहीजण तर मुक्यासारखे गप्पच रहातात.

ईश्वराने दिलेल्या प्रत्येक अवयवाचा आपण प्रत्येकाने निदान त्याच्या भजन-पूजनाच्या वेळी तरी योग्य तऱ्हेने उपयोग केला पाहिजे. असे केल्यानेच ईश्वरभक्ती फळाला येते.

# ३. मुलांनी मुलांसाठी चालविलेले दुकान

बाजारात आपण खरेदीसाठी जेव्हा जातो तेव्हा कितीतरी दुकाने पहावयास मिळतात. नाना वस्तूंची विक्री करणारी दुकाने, त्यातली वस्तूंची मांडणी, नोकरवर्गाची तत्परता, मालकाची प्रसन्न वृत्ति या गोष्टी पाहून आपण खूष होऊन जातो आणि बरीचशी खरेदी करून घरी परततो.




बाजारात काही दुकाने सहकारी पद्धतीने चाललेली असतात. काही दुकाने एकाच व्यक्तीच्या मालकीने चाललेली असतात.

एखाद्या दुकानात मालक-नोकर भरपूर असतात तर एखाद्या दुकानात एकच एक व्यक्ति माल दाखविणे, माल देणे व पैसे घेणे असा व्यवहार करताना आढळते. इतकेच नव्हे तर लुळ्या, पांगळ्या, आंधळ्या व्यक्तीही काही दुकानातून व्यवहार पहात असल्याचेही पहायला मिळतात. युद्धात एखादा पाय वा हात गमावलेला जवानही एखाददुसरा जवान स्टॉल चालवीत असतो.

दुकान चालविणे ही बाब तशी सोपी नाही. अतिशय कठीण अशी बाब आहे. दुकानातील मालावर लक्ष ठेवणे, नाना वस्तूंचे भाव लक्षात ठेवणे, खरेदीसाठी आलेल्या गिऱ्हाईकांना समंजसपणाची वागणूक देणे, मालाची प्रशंसा करून माल खपविणे व जमाखर्चाचा हिशेब चोख ठेवून नफा मिळविणे या गोष्टी कुशलतेने दुकान चालविणाऱ्या व्यक्तीला हाताळाव्या लागतात. म्हणजे व्यवहारदक्ष, चतुर अशा माणसाविना दुकान उत्तम चालणे शक्यच नाही. पण मी तर तुम्हाला आज अगदी एका वेगळ्याच दुकानासंबंधी माहिती देणार आहे. हे दुकान अगदी अजब आहे. आपोआप सुरू होणारे व आपोआप बंद होणारे. या दुकानात कोणी दुकानदार नाही. असे असूनही या दुकानाचे सगळे व्यवहार अगदी सुरळीत चालतात. या दुकानाचे नांव आहे–' प्रामाणिकपणाचे दुकान '.

हे प्रामाणिकपणाचे दुकान तुमच्यासारख्या लहान मुलांचेच आहे. नागपूरमध्यें बंगडगज नांवाची जुनी वस्ती आहे. या

वस्तीत महापालिकेची शाळा आहे. या शाळेतच हे आगळे वेगळे असे दुकान आहे.

शाळेत एक व्हरांडा आहे. तेथे एक टेबल मांडलेले असते. या टेबलावर विविध शालोपयोगी वस्तू मांडून ठेवलेल्या असतात. एका फलकावर वस्तूचे नांव व किंमत लिहून ठेवलेली असते. शाळा सुरू होते आणि शाळेतील लहान मुले टेबला-भोवती जमतात. ज्याला हवी असेल ती वस्तु तो उचलतो आणि टेबलावर ठेवलेल्या डबीत त्या वस्तूच्या किंमतीएवढे पैसे टाकतो. कुणीही डब्यात कधीही कमी पैसे टाकत नाही. मुलांचे सगळे व्यवहार अत्यंत प्रामाणिक आणि चोख चालत असतात.

या दुकानात मिळणारी हरेक वस्तू ही बाजारापेक्षा स्वस्तच असते. वस्तुविक्रीपासून मिळणाऱ्या नफ्यातून आतापर्यंत अनेक चांगली पुस्तके विकत घेऊन मुलांनी वाचनालय सुरू केले आहे. त्याचा फायदा मुलांना होत आहे. 'प्रामाणिकपणाचे दुकान' चालविणे कठीण पण नागपूरच्या मुलांनी ते यशस्वीपणे चालविले आहे. अशा मुलांचे कौतुक कोण करणार नाही ?

# ४. मनाला मोहविणारी मनमोहनची कृतज्ञता

एकदा मनमोहन माझ्या घरी आला. मनमोहन हा सुस्वभावी मुलगा आहे. अतिशय विनयशील व ज्ञानोपासक असा छोकरा.

मी कामात होतो. मनमोहन निश्चल उभा राहिला. निःशब्द राहिला. माझे काम संपले तसा तो मंद स्मित करीत म्हणाला, 'संपल काम ?'

'हो, पण तू केव्हा आलास ?' मी त्याला विचारले.

'हा आताच !' असं म्हणून त्यानं एक हापूसचा आंबा माझ्या टेबलावर ठेवला. आंबा उघडा नव्हता. खाकी कागदात तो गुंडाळलेला होता. त्यामुळे काय आहे ते प्रथम मला कळेना. मी म्हटले 'हे काय ? हा चेंडू कशाला आणला आहेस ?'

तो हंसला नि म्हणाला, 'चेंडू नाही, हें फळ आहे.'

'कसले रे ?'

'आंब्याचे.'

'ते कशाला ?'

'तुम्हाला द्यायला.'

'मला ?'

'होय, आमच्याकडे कोंकणातून आंबे आले आहेत. खाताना तुमची आठवण झाली. घेऊन आलो.'

मनमोहनचा नि माझा परिचय तसा बऱ्याच वर्षांचा आहे. तो लहानपणी गोष्टी लिहायचा. त्यावेळी मी त्याला लेखनाबाबत मार्गदर्शन करीत असे. आता तो मोठा झाला आहे. नोकरीला लागला आहे. पण अजून त्याला माझा विसर पडलेला नाही. अधूनमधून तो असाच केव्हातरी मला भेटायला घरी येतो पण रिकाम्या हाताने कधी येत नाही. कधी सुंदर चित्रांचे कॅलेंडर आणतो, कधी डायरी तर कधी आणखीन कसली तरी वस्तू मला भेट म्हणून द्यायला त्याच्या हातात असतेच.

त्या दिवशी मनमोहन आंबा ठेवून निघून गेला. पण माझे विचारचक्र सुरू करून गेला. त्याने आणलेले आंब्याचें ते एकच फळ पण त्यामध्यें त्याचे केवढे तरी प्रेम भरलेले होते, त्यात मनमोहनचे निर्मल मन होते. माझ्यावरील निष्ठा होती. कृतज्ञतेची भावना होती. अशी निष्ठा, असे प्रेम आणि अशी कृतज्ञता क्वचितच पहायला मिळते. मनमोहनची कृतज्ञता मन मोहून टाकते.

दरवर्षी मनमोहनकडे मी गणपतीला न विसरता दर्शनासाठी जातोच. तोही अगत्यपूर्वक मला निमंत्रण देत असतो. त्यांच्या आग्रही वृत्तीचा अव्हेर मला करता येत नाही.

आपल्याला चांगली वस्तु खायला व प्यायला मिळाली की आपले जीवन चांगले घडविणाऱ्या व्यक्तीची आठवण ठेवणे यालाच कृतज्ञता म्हणता येईल. तुम्हा मुलांजवळ अशी कृतज्ञता हवी.

# ५. जीवनात हवा कष्टाळूपणा व जिद्द

दुपारचा एक वाजला होता. ऊन अगदी मी म्हणत होते. दूधकेंद्रावर मुलामुलींची, स्त्री-पुरुषांची मोठी गर्दी उसळली होती. आरडाओरडा चालू होता.

एक छोटा मुलगा. वय असावे बारा वर्षांच्या आसपास. त्या मुलाने जवळजवळ तीस ते पस्तीस बाटल्या दूध घेतले व कंतानाच्या तीन मजबूत पिशव्यांत प्रत्येकी दहाबारा बाटल्या घालून त्या घेऊन तो निघाला. माझ्याजवळून तो चालला होता. घामाने भिजून तो अगदी ओलाचिंब झाला होता. पिशव्या संभाळीत संभाळीत तो चालला होता. पिशव्या संभाळणे जरुरीचेच होते. जर एखाद्या पिशवीतली एखादी बाटली पडून फुटली तर ?

पिशव्याचे ओझे त्याला फारच जड वाटत होते. मला त्याच्याविषयी फारच सहानुभूती वाटली. मी त्याला विचारले, 'बाळ, इतक्या बाटल्या कशाला ?' तेव्हा तो म्हणाला, 'ही माझी छोटीशी नोकरी आहे. ज्यांना दूधकेंद्रावर येण्यास वेळ नसतो किंवा ज्यांच्या घरी दूधकेंद्रावर येण्यासाठी कुणीही नाही त्यांच्या दुधाच्या बाटल्या मी रोज घेऊन पोहोचत्या करतो. महिना झाला की मला त्यांच्याकडून बाटल्याच्या हिशोबात पैसे मिळतात.'

मी विचारले, 'तुझे घरी कोण आहे ?' तो म्हणाला– 'माझी आई.'

'वडील ?' माझा प्रश्न

'मला वडील नाहीत व म्हणूनच मी हे काम करतों' त्याचे उत्तर.

मी विचारले–'तूं शाळेत जातोस का ?'

तो म्हणाला, 'जातो. मी रात्रीच्या शाळेत जातो. सहावीत आहे. पण मला पुस्तके, वह्या घेता येत नाहीत. फी कशीतरी भरतो.'

त्या गरीब, कष्टाळू व हुशार मुलाबद्दल मला दया आली. या मुलाप्रमाणेच कुणी केळ्याचे घड घेऊन केळी विकतो. तर कुणी गळ्यात डबा बांधून चिकू विकतो. या मुलासारखी अनेक मुले आहेत की, ज्यांच्या प्रगतीपुढे त्यांची गरीब परिस्थिती आड येते. अशा मुलांना मदत करणे हे धनिक मुलाचे कर्तव्य आहे. गरीब कष्टाळू व जिद्दीची मुले भावी आयुष्यात नक्कीच कुणीतरी मोठी होतात.

★

## ६. पक्षी–प्राणी–आपले सोबती

सायंकाळच्यावेळी मी बागेत गेलो होतो. बागेतले वातावरण अगदी प्रसन्न होते. मी आनंदात हवा खात बाकावर बसलो होतो. तेवढ्यात तेथे एक मरतुकडे कुत्रे आले. अगदी हाडांचा सापळा झालेले. बागेत कांही मुले खेळत होती. त्या मुलांचे लक्ष मरतुकड्या कुत्र्याकडे गेले. त्यांनी त्याला दगड मारून पिटाळले. मला ही गोष्ट आवडली नाही. त्या कुत्र्याला पिटाळायचेच होते तर हाड् हाड् करून पिटाळून लावता आले असते पण तसे न करता मुलांनी दगडांचा मारा करून त्या कुत्र्याला पिटाळले.

बरीच मुले वेड्या माणसांना, मुक्या प्राण्यांना, भिकाऱ्याला, थोडक्यांत सांगायचे तर दीनदुबळ्यांना नाहक त्रास देतात, छळतात आणि त्यांना हैराण करून सोडतात. या प्रकाराने भूतदयेचा मुलांच्या ठायी अभाव दिसून येतो.

प्राणी हे आपले सोबती असतात. गाय, बैल, मांजर, कुत्रा इत्यादी पाळीव प्राणी आपली केवढीतरी सेवा करतात. अशा प्राण्यांच्या बाबतीत आपण सर्वांनी दयेने वागले पाहिजे. प्रेमाने वागले पाहिजे. माणसाळलेले व आपणाला आवडणारे पक्षी-प्राणी आपण मोठ्या हौसेने पाळून, बाळगून आपण आपणासाठी आनंद व त्यांचा आत्मविश्वास मिळवायला शिकले पाहिजे.

❀

# ७. चोरी कधी करू नये !

रस्त्यातून चालताना थंड पेयाच्या बाटल्या घेऊन जाणारी एक उघडी गाडी उभी असलेली दिसली. तिच्या अवतीभवती बरीच गर्दी दिसली. मला वाटले अपघात झाला असावा. पुढें झालो. पहातो तर वेगळाच प्रकार.

एका छोट्या शाळकरी मुलानें त्या उघड्या असलेल्या गाडीतून बाटल्यांच्या बॉक्समधून थंड पेयाच्या दोन बाटल्या काढून घेतल्या होत्या. तो त्या बाटल्या चोरून नेणार होता. पण कुणाचेतरी त्याच्याकडे लक्ष गेले. आरडाओरड झाली. लोक जमले. कंपनीच्या नोकराने त्या मुलाला पकडले. जो तो माणूस त्याच्याकडे चोर म्हणून पाहू लागला. कांही-जण त्याला बोलू लागले. आपली सोडवणूक व्हावी म्हणून तो मुलगा रडू लागला. गयावया करू लागला.

तो मुलगा सधन घराण्यातला होता. त्याच्या शर्टावर तो शिकत असलेल्या शाळेच्या नांवाचा बिल्लाही होता. तो लहान असल्याने त्याला दम देऊन व पुन्हा असे करू नकोस असे बजावून सोडून देण्यात आले.

चोरी कधी करू नये, खोटे कधी बोलू नये असा उपदेश वडील मंडळी तुम्हा मुलांना नेहमी करतात. पण बरीच मुले तो उपदेश आचरणात आणीत नाहीत. अशा मुलांच्या कृतीवर

शहाण्या मुलांनी लक्ष ठेवले पाहिजे. त्यांना दुराचारापासून दूर ठेवले पाहिजे. परावृत्त केले पाहिजे. जर असे घडले नाही तर बालगुन्हेगारी वाढीस लागते. बालगुन्हेगारीस वेळीच आळा घातला गेला पाहिजे आणि तोही मुलांकडून.

## ८. भर रस्त्यात मुलांची मारामारी

शनिवारचा दिवस. शाळा सुटली. रस्ताभर मुले विखुरली. घराच्या ओढीमुळे जो तो मुलगा दप्तराचे ओझे सांभाळीत झपझप चालत होता. पाऊस नुकताच पडून गेला होता. त्यामुळे रस्त्यावर चिखलाची रपरप झालेली होती.

शाळेजवळ बरीच गर्दी दिसली. म्हणून मी पुढे झालो आणि पहातो तर काय दोन छोटी शाळकरी मुले अगदी खरीखुरी मारामारी करीत होती. दोन्ही मुले अगदी रागाने लालेलाल झाली होती. आव्हाने प्रतिआव्हाने स्वीकारीत ती एकमेकांना गुद्द्यावर गुद्दे लगावीत होती. मला त्यांची मारामारी पाहून कोंबड्यांच्या झुंजीची आठवण झाली. खेडेगावात दोन कोंबडी जशी झुंजतात तशी ती मुले झुंजत होती. त्यांची दप्तरे रस्त्यांतच चिखलात पडली होती. त्यांची त्यांना मुळीच पर्वा नव्हती. त्या दोघांपैकी एकजण जेव्हां हैराण होऊन रडू लागला तेव्हा त्यांची मारामारी पहाणाऱ्यापैकी

दोनतीन मोठी माणसे पुढे झाली आणि त्यांनी त्यांना एकमेकांपासून दूर केले. मारामारी संपली. बघे आपापल्या मार्गाला लागले.

दोन्ही मुलगे एकाच शाळेचे विद्यार्थी होते. इतकेच नव्हे तर एकाच वर्गात शिकणारे होते. म्हणजेच वर्गमित्र होते. क्षुल्लक कारणावरून त्यांचे भांडण झाले होते आणि त्याचा परिणाम रस्त्यांवर मारामारी करण्यात झाला होता.

मला खूप वाईट वाटले. भांडण झाले तर तें सामोपचाराने मिटविले पाहिजे. ज्याची चूक असेल त्याने ती कबूल केली पाहिजे व सुधारली पाहिजे. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी भांडावे, रस्त्यावर येऊन मारामारी करावी हे बरे नव्हे. मुलांनी असले गैरवर्तन करता नये.

## ९. गोड बोलणे—वागणे एक सुसंस्कार

कामगारभागातील एका जुन्या इमारतीचा पत्ता हुडकीत मी व माझे कांही मित्र त्या इमारतीत शिरलो. जिन्यावरच कांही मुले कसरत करीत होती. म्हणजेच कुणी जिन्यावर जोराने पाय आपटीत वर जात होते तर कुणी जिन्यांच्या उभट कठड्यावरून घसरगुंडीवरून घसरत यावें तशी घसरत येत होती.

आम्हाला जिना चढताना पाहून आणि आम्ही अनोळखी असल्याचे हेरून, 'अहो, कोण पाहिजे? कोण पाहिजे तुम्हाला?' असे त्यांनी विचारायला सुरुवात केली. ज्या व्यक्तीकडे आम्ही चाललो होती त्या व्यक्तीचे नाव आम्ही त्यांना सांगितले व कितव्या मजल्यावर रहातात असे विचारले.

यावर त्या मुलांपैकी सर्वांनीच एक सुरात, एक तालात उत्तर दिले, 'तिसऱ्या मजल्यावर संडासाजवळच्या खोलीत.'

आम्ही जिना चढून वर गेल्यावर ती सर्व मुले 'लांब लांब पाहुणे!' अशी एकसाथ ओरडली.

आम्ही तिसऱ्या मजल्यावर गेलो तेथे चौकशी केली तेव्हा समजले की, आम्हाला हवी असलेली व्यक्ती पहिल्याच माळ्या-वर रहात होती.

आमची फसगत करणाऱ्या त्या मुलांची आम्हाला चीड आली. खाली आलो तेव्हां ती मुले विचारू लागली, 'काहो, भेटले का ते तुम्हाला?'

आमच्यापैकी एकाने त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. तशी ती सर्व मुले आरडाओरडा करीत पसार झाली.

टवाळ मुलांचा हा असा नमुना. नेहमीच कुठे ना कुठे तरी आढळतो. या अनोळखी मुलांना दम द्यावा, मारावे तर ते

शक्य होत नाही, गंमत म्हणून ही मुले मोठ्यांची छेड काढतात पण मोठ्यांना त्यापासून नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. अशा मुलांची संगत समंजस मुलांनी करता नये. मुलांचा हा प्रश्न कसा सोडविता येईल याचा विचार व्हायला हवा. मुलांनी अनोळखी मोठ्या माणसांशी चांगले बोलावे, चांगले वागावे हा सुसंस्काराचाच एक भाग आहे.

## १०. चोर पकडणारा छोटा जेम्स बाँड

परीक्षा जवळ आली होती. पुरुषोत्तम रात्र रात्र जागून अभ्यास करू लागला होता. एका रात्री तो खिडकीजवळ खुर्चीवर बसून इतिहासाचे पुस्तक वाचीत होता. रात्रीचे दोन वाजून गेले होते पण पुरुषोत्तमला त्याची कल्पनाही नव्हती. तो वाचनात गढून गेला होता.

पुरुषोत्तम पुस्तक वाचीत असताना एकाएकी त्याची नजर खिडकीबाहेर गेली. खिडकीसमोरील रस्त्यावर असलेल्या शिंप्याच्या दुकानात कुणीतरी अज्ञात इसम शिरले होते आणि ते तिजोरीतील रोकड, कपाटातील उंची कपडे घाईघाईने गोळा करीत होते. पुरुषोत्तमने चाणाक्षपणे ओळखले की दुकानात शिरलेले इसम दुसरे तिसरे कुणी नसून चोर आहेत. त्या चोरांनी पैसे, कपडे व इतर सामान जमा केले व दुकानासमोर

उभ्या केलेल्या मोटारीत ठेवून तीमध्यें ते बसले. पुरुषोत्तमने चटकन त्या मोटारीचा नंबर हातातील पुस्तकावर टिपून घेतला. चोर मोटार भरधाव हाकून निघून गेले.

पुरुषोत्तम बसल्या जागेवरून पटकन उठला. टेबलाजवळ गेला. तेथे टेलिफोन डिरेक्टरी होती. पोलिसांच्या वायरलेसचा नंबर तिच्या मुखपृष्ठावरच ठळकपणे छापलेला होता तो पाहून क्षणाचाही विलंब न लावता त्याने घरातील टेलिफोनवरून पोलिसांना कळविले. एकदोन मिनिटांच्या अवधीतच वायरलेस-वरून त्या मोटारीचा शोध घेण्याच्या आज्ञा शहरभरच्या पोलिसांना गेल्या. पहाटे चारच्या सुमारास सर्व चोरांना मुद्देमालासह पकडण्यात आले. त्यांनी वीस हजार रुपयांची चोरी केली होती.

सकाळ होतांच पुरुषोत्तमच्या प्रसंगावधानतेची बातमी सर्वत्र पसरली. शाळेतसुद्धा शाळेच्या मुख्याध्यापकांनी पुरुषोत्तमचा खास गौरव केला. ते म्हणाले. अट्टल चोरांना पकडून देणारा ‘ जेम्स बाँड ’ नांवाचा गुप्त हेर होऊन गेला. आपला पुरुषोत्तम हा ‘ छोटा जेम्सबॉन्ड ’ आहे. त्या दिवसापासून पुरुषोत्तम ‘ छोटा जेम्सबाँड ’ म्हणून ओळखला जाऊ लागला. असा हवा चाणाक्षपणा. अशी हवी प्रसंगावधानता.

## ११. नशिबापेक्षा प्रयत्नच श्रेष्ठ

तक्षशिला विद्यापीठात पाणिनी नावाचा एक छोटा मुलगा शिकत होता. दिवसभर खोड्या करायचा. अभ्यासाकडे लक्षच द्यायचे नाही एवढेच त्याला माहीत होते.



एकदा त्याला एक ज्योतिषी अचानक भेटला. त्याची चेष्टा करण्यासाठी पाणिनीने त्याला आपला हात दाखविला. ज्योतिषाने त्याचा हात पाहून म्हटले ' तुझ्या हातावर विद्येची रेषाच नाही. तू कुठेही गेलास तरी शिकू शकणार नाहीस. '

हे ऐकून पाणिनीला त्या ज्योतिषाचा खूप राग आला. रागाच्या भरात त्याने आपल्याजवळ असलेल्या चाकूने आपल्या हातावर जोराने रेष ओढली. त्या चिरेतून घळघळ रक्त वाहू लागले. ती रक्ताची चीर ज्योतिषाला दाखवीत तो म्हणाला, ' ही पहा माझी विद्येची रेषा. हिला साक्ष ठेवून मी अभ्यास करणार. '

पुढे पाणिनीने खोडकरपणा सोडला आणि मोठ्या निश्चयाने रात्रंदिवस खपून अभ्यास केला. निश्चयाच्या आणि अभ्यासाच्या बळावर तो मोठा विद्वान झाला. त्याने व्याकरण लिहिले. तेच आज तुम्ही आम्ही शिकत असतो. व्याकरणकर्ता म्हणून त्याची कीर्ति जगभर पसरली. कर्तबगारीच्या बळावर ज्योतिषाचे वाक्य खोटं पाडता येते. नशीब श्रेष्ठ नसून कर्तृत्व, प्रयत्न श्रेष्ठ आहेत हे पाणिनीनं दाखवून दिले. म्हणून नशिबा-वर हवाला न ठेवता कर्तबगारीबाबत आत्मविश्वास बाळगावा.

BVBK-0400018

## १२. पेपरमिंटच्या गोळीतील देशव्यापी प्रेम

दुपारचे अकरा वाजले होते. मी कचेरीत चाललो होतो. हमरस्त्यावरील चौकात मी आलो. पहातो तर काय तोबा गर्दी.

गर्दीतील काही माणसे जल्लोषाने नाचत आहेत. प्रत्येक जण आनंदाने बेहोष झालेला. मी पुढे झालो.

एक भला मोठा फलक उभा केलेला दिसला. अहमदाबादला चाललेल्या भारत विरुद्ध श्रीलंका दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याचा तो धावफलक होता. आमच्या संघाच्या सुरींदर अमरनाथने डावात धावांची शंभरी पुरी केली होती. त्यामुळे सर्वांनाच आनंद झाला होता. धावफलकाला भला मोठा पुष्पहार घालण्यात आला होता. फटाके लावले जात होते.

मी धावफलक पाहिला व पुढे निघालो. तेवढ्यात एका गोंडस गुजराती छोकऱ्याने एक लहानशी पेपरमिंटची गोळी मला दिली. मी त्याला म्हटले, 'कारे ? कशाबद्दल ? '

तो चटकन उद्गारला 'अमरनाथने सेंच्युरी लगाई इसलिये ! '

'थँक्यू !'....असे म्हणून मी मोठ्या कौतुकाने त्याने दिलेली ती गोळी तोंडात टाकली, व पुढे चालू लागलो. चालताना माझ्या मनात विचार आला. आमच्या संघाच्या गड्याने शंभर धावा काढताच आबालवृद्धांना आनंद होणे साहजिकच आहे. पण तो व्यक्त करण्याची त्या छोट्या मुलाची रीत मात्र अपूर्व म्हटली पाहिजे.

मला त्या मुलाचे खूपच कौतुक वाटले. एका लहानग्या मुलाला आपला देश, आपल्या देशाचा क्रिकेट संघ आणि

त्यातील खेळाडूविषयी केवढे मोठे प्रेम. त्याने दिलेली पेपरमिंटची ती एक लहानशी गोळी पण त्या गोळीत मला त्या मुलाचे देशव्यापी देशप्रेम आणि आपल्या खेळाडूविषयीची आपुलकी दिसली.

भारतीय माणूस तो कुठल्याही प्रांतातला, पंथातला, क्षेत्रातला असो, त्याची कर्तबगारी, त्याचे यश हे इथल्या लहानमोठ्या प्रत्येक माणसाला आपलेच वाटते. राष्ट्रीय एकात्मता ही अशी दिसली पाहिजे, आणि ती याच पद्धतीने टिकली पाहिजे. मला तो मुलगा खूपच काही सांगून गेला होता. खरंच, खूप काही सांगून गेला होता.



बाल वाङ्मय विभाग.
क्र. ९८
विषय बा-बा.

समाप्त

# ५० पुस्तकें ! फक्त २२ रुपयांत

जगन्नाथ शंकरशेट
भक्त प्रल्हाद
ध्रुव बाळ
कचदेवयानी
सती अहिल्या
सहावा अवतार
वीर हनुमान
देवर्षी नारद
शकुंतला
राजकन्या रुक्मिणी
रामकथा
बाबूलनाथ
सिद्धीविनायक
लव कुश
पांडवांची कथा
शूर सौदामिनी
मच्छिंद्रनाथ
झकीर हुसेन
जादूगार राजकन्या
राणीची बाग
जादूचा चिंतामणी
दोन जादूगार
दिल्लीचा ठग
बिरबलच्या गोष्टी
चोरांची गुहा
अद्भूत हिरा
मंतरलेली वाट
टिंगलगांवची राणी
जादूचा मोर
सुवर्णपंखी अश्वराज
एकशिंगी राक्षस
सुगंधी राजवाडा
मंतरलेला तुरा
गुहेतील गुपित
जादूचा हंस
शेख मुजीबूर रहेमान
भुताचे घर
जादूचा सोटा
वाघिणीशी सामना
सप्तरंगी डबी
जादूचा अंगरखा
मोत्यांचा कंठा
जादूची सुपारी
मंतरलेले पाणी
जादूचे मांजर
फुलपंखी राजकन्या
जादूचा नारळ
बावळट बाळोबा
चलाख चोर
नव्या वाटा

**जय हिंद प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २**

मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटींग वर्क्स, मुंबई–४